# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव विभाग

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/ २०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १८/०७/२०२३ चे ठराव.**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९८२** — **विषय क्रमांक- १९८२**

**दिनांक – १८/०७/२०२३** — **विभाग- माहिती व तंत्रज्ञान**

| | |
|---|---|
| विषय क्र.१९८२ दिनांक - १८/०७/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/१२/कावि/९४/२०२३ दि.१३/०७/२०२३ अन्वये, स्मार्ट सिटी अंतर्गत होणा-या सीसीटीव्ही सर्व्हेलन्स कामा व्यतिरिक्त इतर उर्वरीत ठिकाणी सर्व्हेलन्स स्मार्ट एनर्जी मॅनेजमेंट, स्मार्ट सिक्युरिटी सोल्युशन, स्मार्ट टेलीफोनी, बिल्डींग मॅनेजमेंट, इत्यादि कामे करणेसाठी सल्लागार नेमणूक करणेबाबत. |
| ठराव क्र.१९८२ दिनांक - १८/०७/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/१२/कावि/९४/२०२३ दि.१३/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रकल्प करीता मे.E & Y LLP यांची आदेश क्र.वि/मुका/६/कावि/४५३/२०२१ दि.०७/०६/२०२१ अन्वये प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. प्रस्तुत कामाचे करारनामा अट क्र.२.४ नुसार अद्याप मुळ काम संपलेले नसल्याने व त्यानंतर देखील काही काळाकरीता या कामाची आवश्यकता असलेने दि.०७/०६/२०२३ पासून सहा महिने कालावधी करीता मुदतवाढ देणे व याकामी येणा-या र.रू.६६,५२,८००/- (अधिक प्रत्यक्ष कर) या खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९८३** — **विषय क्रमांक- १९८३**

**दिनांक – १८/०७/२०२३** — **विभाग- पाणीपुरवठा**

| | |
|---|---|
| विषय क्र.१९८३ दिनांक - १८/०७/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/मुख्य/तां/कावि/१०६/२०२३ दि.१३/०७/२०२३ अन्वये, मनपाचे पाणी पुरवठा विभागाकडील तरतूदीमध्ये वाढ घट करणेबाबत. |
| ठराव क्र.१९८३ दिनांक - १८/०७/२०२३ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/मुख्य/तां/कावि/१०६/२०२३ दि.१३/०७/२०२३ अन्वये, मनपाचे पाणी पुरवठा विभागाकडील पाणीपुरवठा योजना निधी खालील तक्त्या प्रमाणे तरतूदीमध्ये वाढ घट करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशीर्ष | पान अ.क्र. | सन २०२३-२४ चा मुळ अंदाज | वाढ | घट | सुधारित / शिल्लक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भोसरी येथे उपलब्ध होणा-या जागेत पाण्याची उंच टाकी बांधणे. (बजेट कोड 222307347) | पाणीपुरवठा योजना निधी | ६६५/११ | ४३००००० | ४००००० | - | ४७००००० |
| २ | दिघी येथे संप व पंप हाऊस व रायजिंगमेन तदअनुषंगिक कामे करणे. | पाणीपुरवठा योजना | ६६५/१२ | १२००००० | - | ४००००० | ८००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | (बजेट कोड 222307348) | निधी | | | | | |
| ३ | इ प्रभागात भोसरी येथे विविध टाक्यांवरुन पाणीपुरवठा करण्याकामी मजूर पुरविणे. (बजेट कोड 232403996) | पाणीपुरवठा योजना निधी | ७०५/१ | ६०००००० | - | १५५०००० | ४४५०००० |
| ४ | इ प्रभागात विविध ठिकाणी बोअरवेल घेणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. (बजेट कोड 222311972) | पाणीपुरवठा योजना निधी | ७०७/८ | ०० | १५५०००० | - | १५५०००० |
| ५ | प्रभाग क्र ४ दिघी साठी भोसरी संप ते दिघी संप पर्यंत नवीन रायजिंग मेन टाकणे व आनुषंगिक कामे करणे. (बजेट कोड 222307268) | पाणीपुरवठा योजना निधी | ६५०/२० | ६८००००० | ३०००००० | - | ९८००००० |
| ६ | पॅकेज १- डुडुळगाव, चोवीसावाडी, वडमुखवाडी व च-होली या ठिकाणी पाण्याची मुख्य नलिका टाकणे, ८ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे, १ शुध्द पाण्याची टाकी व पंपहाऊस उभारणे व कार्यान्वित करणे. (बजेट कोड 222307557) | विशेष योजना निधी | ६६६/३० | २४००००००० | - | ३०००००० | २३७०००००० |
| | **एकूण** | | | २५८३००००० | ४९५०००० | ४९५०००० | २५८३००००० |

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९८४** **विषय क्रमांक- १९८४**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- पशुवैद्यकिय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९८४ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पवै/०१/कावि/६२३/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, मनपाचे पशुवैद्यकीय विभागाचे कामकाजाकरिता बाह्यस्त्रोत पध्दतीने मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेबाबत. |
| **ठराव क्र.१९८४ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पवै/०१/कावि/६२३/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडील निविदा नोटीसक्र.१/२०२३-२४ अन्वये सदर काम/पुरवठा करणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरीलप्रमाणे निविदा क्र.१/२०२३-२४ साठी ७ प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.साई एजन्सी या ठेकेदाराची निविदा रक्कमेच्या र.रु.१% दराने निविदा आलेली असल्याने व तुलनात्मक दृष्टया वाजवी दराची असल्याचे तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकाप्रमाणे पुर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत. मा.आयुक्त यांनी दि.१३/०७/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु. १.००% प्रमाणे काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीशर्तीप्रमाणे तसेच कामगार कल्याण विभागाकडील किमान वेतन दरानुसार निर्धारित केलेल्या कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार रक्कम अदा करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९८५** **विषय क्रमांक- १९८५**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९८५ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१२/कावि/१०/२०२३ दि.१३/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका करिता Sustainability Cell च्या उद्घाटनाच्या कार्यशाळेच्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत. |
| **ठराव क्र.१९८५ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१२/कावि/१०/२०२३ दि.१३/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका मध्ये Sustainability Cell स्थापन करण्यात आला आहे. सदर सेलबाबतची कार्यशाळा दिनांक २१।०६।२०२३ रोजी हॉटेल टिपटॉप, वाकड येथे आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेसाठी GOI, GOM, मनपाचे अधिकारी, प्रतिनिधी व पत्रकार असे एकूण अंदाजे ३१५ व्यक्ती उपस्थित होते. सदर Sustainability Cell कार्यशाळेचे उद्घाटन मा.विधान परिषद सदस्या श्रीमती उमा खापरे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर दिवसभराच्या कार्यशाळेमध्ये मा.आयुक्त, मनपाचे सर्व विभागप्रमुख, पर्यावरण तज्ञ तसेच नागरिक यांच्यासमवेत विचारांची देवाण घेवाण होऊन पर्यावरण विषयक बाबींवर साधक-बाधक चर्चा झाली. त्यामधून Sustainability Cell चे पुढील वाटचालीबाबत दिशा मिळाली. सदर कार्यशाळेसाठी Sustainability Cell चा Logo design करणे, Backdrop व सर्व Flex design करणेकरीता बळवंत प्रिंटर्स प्रा. लि. यांनी त्यांचेकडील कोटेशन / इनव्हाईस दि.५/७/२०२३ रोजी सादर केले आहे. व त्याकरीता त्यांनी र.रु.४३,६००/- + र.रु.७,४४८/- (Taxes) एकुण र.रु.५१,४४८/- ची मागणी केलेली आहे. सदर कार्यक्रमासाठी मे.टिप टॉप इंटरनॅशनल यांचेकडील कोटेशन दि.२९/०६/२०२३ अन्वये Event Management charges व Decoration Management charges करीता र.रु.६,४९,८००/- + र.रु.१,१६,९६४/- (Taxes) एकुण र.रु.७,६६,७६४/- खर्च आलेला आहे. सदर कार्यक्रमाकरीता एकूण अंदाजे र.रु.८,१८,२१२/- खर्च झाला आहे. तरी सदर कार्यक्रमाच्या खर्चासाठी मनपाच्या सन २०२३ – २४ चा मुळ अंदाजपत्रकात 'पर्यावरण' या लेखाशीर्षकावर तरतुद उपलब्ध आहे. सबब, 'पर्यावरण' या लेखाशीर्षकावरून तरतूद खर्ची टाकणेस मा.प्रशासक यांची कार्योत्तर मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णयः | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९८६** **विषय क्रमांक- १९८६**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- क्रीडा**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९८६ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रिडा/७/कावि/२४३/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०२३-२४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.१९८६ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रिडा/७/कावि/२४३/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, कॅरम असोसिएशन ऑफ पुणे यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे ४११०३३ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जुलै २०२३ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे |

| | |
|---|---|
| | कै.सौ.मनिषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे ४११०३३ येथे "जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०२३" (पुरुष, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.५,३८,७४०/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता घेणे, सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च हा स्थापत्य क्रीडा विभाग यांचे संबंधित लेखा शिर्षामधून व विद्युत विषयक खर्च हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभाग यांचे लेखा शिर्षामधून व पी.व्ही.सी फ्लेक्स बॅनर विषयक खर्च हा मध्यवर्ती भांडार विभागातील लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल तसेच क्रीडा विभागाकडील खर्च हा क्रीडा विभागाचे "महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा" या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस, तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९८७** **विषय क्रमांक- १९८७**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- जशुके से.२३ पाणीपुरवठा**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९८७ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जशुके/पापु/४२३/२०२३ दि.१३/०७/२०२३ अन्वये, मनपाचे "पाणीपुरवठा भांडवली खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत मनपा सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात नविन कामाचा समावेश करणेबाबत. |
| **ठराव क्र.१९८७ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जशुके/पापु/४२३/२०२३ दि.१३/०७/२०२३ अन्वये, मनपाचे जलशुध्दीकरण केंद्र से.क्र.२३ येथे अद्यावत तंत्रज्ञानानुसार सुधारणा करणे व इतर अनुषंगिक कामे करणेसाठी खालील प्रमाणे नवीन कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणे, अंदाजपत्रकीय रकमेस तसेच सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये तरतुद ठेवणे यासाठी वाढ – घट करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.<br>नवीन अंदाजपत्रकात समाविष्ट करावयाची काम व त्यानुसार करावयाची आवश्यक वाढ - घट तक्ता |

| अ. क्र. | कामाचे नाव | पान/अ.क्र. | कामाची अंदाज पत्रकीय रक्कम | सन २०२३-२४ चा मूळ अंदाज | वाढ | घट | सन २०२३-२४ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | से.क्र२३ निगडी टप्पा क्र.२ फिल्टर हाउस ते टप्पा २. संप नवीन पाईप लाईन टाकणे, व्हॉल्व बसविणे इत्यादी इतर अनुषंगिक कामे करणे. (लेखाशिर्ष – पाणीपुरवठा भांडवली खर्च) | ६६०/३८ | ३ कोटी | २ कोटी | ० | १.५ कोटी | ५० लाख |
| २ | सेक्टर क्र.२३, जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.१,२,३ व ४ चे अद्यावत तंत्रज्ञानानुसार Augmentation करणे, Zero Liquid Discharge प्रणाली उभारणे वइतर अनुषंगिक कामे करणे. (लेखाशिर्ष – पाणीपुरवठा भांडवली खर्च) | सदर कामाचा नवीन अंदाज पत्रकात समावेश करणे. | ६० कोटी | ० | १.५० कोटी | | १.५० कोटी |
| | | एकूण | ६३ कोटी | २ कोटी | १.५० कोटी | १.५० कोटी | २ कोटी |

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९८८** **विषय क्रमांक- १९८८**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- जशुके से.२३ पाणीपुरवठा**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९८८ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जशुके/पापु/४०७/२०२३ दि.०७/०७/२०२३ अन्वये, से.क्र.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रांतर्गत दोन कामांच्या सुधारित अंदाजपत्रकिय रकमेस व सदर कामांना होणा-या वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.१९८८ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जशुके/पापु/४०७/२०२३ दि.०७/०७/२०२३ अन्वये, अ.क्र.१ - से.क्र.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र.३ व ४ खाजगीकरणाने चालविणे" (सन २०१५-१६) (नि.क्र. ११/२/२०१५-१६) या कामाचे सुधारीत अंदाजपत्रकिय र.रु.४,६६,००,०००/- साठी तसेच होणा-या वाढीव र.रु.११,६१,०००/- च्या खर्चास मान्यता देणे आवश्यक आहे.<br>अ.क्र.२ - से.क्र.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र.२व केमिकल हाऊस खाजगीकरणाने चालविणे" (सन २०१५-१६) (नि.क्र. ११/१/२०१५-१६) या कामाचे सुधारित अंदाजपत्रकिय र.रु.५,६१,००,०००/- साठी तसेच होणा-या वाढीव र.रु.१३,०५,०००/- साठी च्या खर्चास मान्यता देणे आवश्यक आहे.<br>वरील दोन्ही कामांसाठी सुधारित अंदाजपत्रकिय रकमेसाठी तसेच सदरची कामे अंतिम करावयाची असल्याने ठेकेदाराचे अंतिम बिल अदायगी करावयाचे आहे परंतु दोन्ही कामांना तरतुद कमी असल्याने वाढ– घट करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

**वाढ- घट तक्ता**

| अ.क्र. | कामाचे नाव | पानांक | सन २०२३-२४ चा अंदाज | वाढ | घट | सुधारित सन २०२३-२४ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | से.क्र. २३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्र खाजगीकरणाने चालविणे ( लेखाशिर्ष – पाणीपुरवठा किरकोळ दुरुस्ती व देखभाल) | ७२१/६१ | १,६०,००,००० | ० | २४६६००० | १३५३४००० |
| २ | से.क्र.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र.३ व ४ खाजगीकरणाने चालविणे" (सन २०१५-१६) (लेखाशिर्ष- पाणीपुरवठा किरकोळ दुरुस्ती व देखभाल ) | ७२०/४७ | ३,१०,००० | ११६१००० | ० | १४७१००० |
| ३ | से.क्र.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र.२व केमिकल हाऊस खाजगीकरणाने चालविणे" (सन २०१५-१६)(लेखाशिर्ष- पाणीपुरवठा किरकोळ दुरुस्ती व देखभाल ) | ७२०/४८ | ३,६०,००० | १३,०५,००० | ० | १६,६५,००० |
| | एकूण | | १६६७०००० | २४६६००० | २४६६००० | १६६७०००० |

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९८९** **विषय क्रमांक- १९८९**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९८९ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मसाभां/२/कावि/९८०/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, राष्ट्रीय कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी १३ वाहनांना मुदत वाढ देणेबाबत. |
| **ठराव क्र.१९८९ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मसाभां/२/कावि/९८०/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी ई- निविदा क्र. ६/२०२१-२२ मध्ये १३ टाटा सुमो अथवा तत्सम खाजगी वाहने भाडे तत्वावर घेण्यात आली असुन, मे.ओम एंटरप्रायजेस यांचे प्रति वाहन प्रति दिन प्रति ८० कि. मी साठी र. रु. १३००/- व त्यापुढील प्रत्येक किमीसाठी र. रु. १२.०० असे लघुत्तम दर दोन वर्षाकरीता प्राप्त झालेले आहे. सदर प्राप्त दरांना मा. आयुक्त सो. यांनी दि. ०२/०७/२०२१ रोजीच्या प्रस्तावास मान्यता दिलेली असुन मा. स्थायी समिती यांनी ठराव क्र. ९९३० दि. १६/०७/२०२१ रोजी खर्चास मान्यता दिलेली आहे. मे. ओम एन्टंरप्रायजेस यांच्या समवेत दिनांक. २६.०७.२०२३ रोजी करारनामा करणेत आला आहे. मे. ओम एन्टंरप्रायजेस यांना जा. क्र. मसाभा/२/कावि/७६७/२०२१ दि. २३/०७/२०२१ अन्वये पुरवठा आदेश निर्गत करणेत आला आहे. याकामी निविदेची मुदत दि.२२/०७/२०२३ रोजी संपत असल्याने व नवीन निविदा प्रकियेस काही कालावधी लागणार असल्याने चालू निविदेस ०२ महिने कालावधीकरीता मुदत वाढ देणे आवश्यक आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १३ वाहनांना ०२ महिन्याकरीता मुदत वाढ देण्याकरीता अंदाजे र.र.११,००,०००/- या खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९९०** **विषय क्रमांक- १९९०**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- पशुवैद्यकीय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९९० दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पवै/१/कावि/६२४/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागांतर्गत पशुवैद्यकीय दवाखाने व प्राणिसंग्रहालयासाठी विविध पदावरील कर्मचा-यांना दरमहा एकत्रित मानधनावर हंगामी (तात्पुरत्या) स्वरुपात मुदतवाढ देऊन नियुक्ती तथा मानधन खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.१९९० दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पवै/१/कावि/६२४/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय दवाखाने व प्राणी सुश्रूषा केंद्र येथे ३ पशुवैद्यकीय अधिकारी या अभिनामाचे पदावर प्रत्येकी दरमहा दरमहा र.रु.६०,०००/- (अक्षरी र.रु.साठ हजार फक्त), ६ लाईव्ह स्टॉक सुपरवायझर या अभिनामाचे पदावर प्रत्येकी दरमहा र.रु.२४,०१०/- (अक्षरी र.रु.चोवीस हजार दहा फक्त) व, ६ डॉग पिग स्कॉड कुली या अभिनामाचे पदावर प्रत्येकी दरमहा र.रु.२१,६१६/- तसेच निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणीसंग्रहालय या ठिकाणी ३ ॲनिमल किपर या अभिनामाचे पदावर दरमहा र.रु.२४,०१०/- (अक्षरी र.रु.चोवीस हजार दहा फक्त) याप्रमाणे ३ महिने कालावधीकरिता अथवा मनुष्यबळ निविदा पुर्ण होणे यापैकी जो कालावधी कमी आहे त्या कालावधीकरिता मुदतवाढ देऊन नियुक्ती तथा मानधन खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९९१** **विषय क्रमांक- १९९१**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- स्थापत्य क क्षेत्रिय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९९१ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/कक्षे/कावि/४५/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, सन 2023-24 च्या अर्थसंकल्पातील मनपाचे क क्षेत्रीय कार्यालयातील कामांच्या तरतुदी मध्ये वाढ/ घट करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत. |
| **ठराव क्र.१९९१ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/कक्षे/कावि/४५/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, सन २०23-24 च्या अर्थसंपकल्पातील क क्षेत्रीय कार्यालयातील प्रभागातील देखभाल दुरूस्ती करणेकामाच्या कामांना सन 2023 -24 च्या अंदाजपत्रका मध्ये अपुरी तरतुद असलेने सदरकामांच्या तरतुदी मध्ये वाढ / घट करणे आवश्यक आहे. ज्या कामामधून घट करावयाची आहे. ती खाली नमुद केलेली कामे ही विशेषयोजनेतील प्रकल्प अंतर्गत चालू आहेत. सदर चालू कामांसाठी सन 2023-24 च्या अंदाजपत्रकामध्ये सन 2023-24 मध्ये होणा-या खर्चाची आवश्यक लागणारी तरतुद करणेतआलेली आहे. व उर्वरित लागणारी तरतुद ही विभागामार्फत सन 2024-25 चे अंदाजपत्रकामध्ये करणेचे नियोजन विभागामार्फत करणेत आलेले आहे. त्यामुळे सद्यस्थिती मध्ये सदर कामातून घट करणेत येणा-या कामे पुर्ण करणेसाठी अडचण निर्माण होणार नाही. सन 2023-24 चे अंदाजपत्रकामध्ये चालू असलेले प्रकल्पांना प्रमुख्याने तरतुदी ठेवणेत आले असलेने प्रभागातील देखभाल दुरूस्तीच्या कामांना पुरेशी तरतुद उपलब्ध झालेली नाही. सबब क क्षेत्रीय कार्यालयातील सन 2023-24 च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदी मध्ये खालील प्रमाणे वाढ/ घट करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी घेणेकामी शिफारस करण्यास मान्यता आवश्यक असलेने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रभाग क्र | सन 2023-24 चे | | लेखा शिर्ष | सन 2023-24 ची मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन 2023-24 साठी एकूण सुधारीत तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पा.क्र | अ.क्र | | | | | | |
| १ | प्रभाग क्र. 8 यशवंतराव चव्हाण चौक ते विश्वेश्वर चौकापर्यंतचा रस्ता अद्ययावत पध्दतीने करणे. (बजेट कोड - 222301430) | 8 | 66 | 153 | विशेष योजना | 15,88,90,000 | | 30,00,000 | 15,58,90,000 | |
| २ | प्रभाग क्र.8 येथील सेंकेत हॉटेल ते मराठा चेंबर्स पर्यंतचा रस्ता अद्ययावत पध्दतीने करणे. (बजेट कोड-222301404) | 8 | 52 | 188 | विशेष योजना | 13,39,38,000 | | 30,00,000 | 13,09,38,000 | |
| ३ | प्रभाग क्र.8 येथील इंद्रायणी चौक लगतचे जे ब्लॉक मधील रस्ते अद्ययावत पध्दतिने करणे. (बजेट कोड-222300465) | 8 | 50 | 119 | विशेष योजना | 9,10,00,000 | | 30,00,000 | 8,80,00,000 | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | प्रबागक्र.8 मधील एम.आय.डी.सी. मधील जे ब्लॉक मधील रस्ते अद्ययावत पध्दतिने करणे. (बजेट कोड - 222300467) | 8 | 50 | 121 | विशेष योजना | 8,00,00,000 | | 30,00,000 | 7,70,00,000 | |
| ५ | प्रभाग क्र. ८ मध्ये ठिकठिकाणी फुटपाथ व इतर स्थापत्य विषयक सुधारणा विषयक कामे करणे. (सन 2023-24) (बजेट कोड - 232400947) | 8 | 120 | 34 | भांड वली | 1,000 | 35,00,000 | 0 | 35,01,000 | |
| ६ | प्रभाग क्र.८ परीसरातील रस्ते WBM/BBM पद्धतीने करुन डांबरी करणे. (सन २०२३-२४) (बजेटकोड- 232400997) | 8 | 123 | 15 | भांड वली | 1,000 | 50,00,000 | 0 | 50,01,000 | |
| ७ | प्रभाग क्र. ८ मधील परिसरामध्ये सेक्टर 4 , 5 व इतर ठिकाणी स्थापत्य विषयक सुधारणा विषयक कामे करणे. (सन2023-24) (बजेट कोड 232400955) | 8 | 120 | 42 | भांड वली | 1,000 | 35,00,000 | 0 | 35,01,000 | |
| | एकूण | | | | | 46,38,31,000 | 1,20,00,000 | 1,20,00,000 | 1,20,03,000 | |

| | |
|---|---|
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी विषयास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेस मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९९२** **विषय क्रमांक- १९९२**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- माहिती व तंत्रज्ञान**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९९२ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/१६/कावि/१५०/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२१ करीता मिळालेल्या पारितोषकाअंतर्गत खर्चाबाबत. |
| **ठराव क्र.१९९२ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मातंवि/१६/कावि/१५०/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, शासन निर्णय क्रमांक प्रसुधा-1119/प्र.क्र.3/18अ, दि. 03/02/2021 अन्वये “राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान” पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत दि.20 ऑगस्ट ते 02 ऑक्टोंबर 2021 या कालावधीत राबविणेत आलेले होते. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासननिर्णय क्रमांक रागांअ-1121/प्र.क्र.47/18/ अ, दि.18/04/2022 नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस कार्यालयीन व्यवस्थापनामध्ये आधुनिक संकल्पना व कार्यपद्धतीचा अंगिकार केलेबाबत प्रथम क्रमांकाचे रुपये 10 लक्ष इतक्या रक्कमेचे पारितोषिक धनादेश स्वरुपात प्राप्त झालेले होते. पारितोषिक प्राप्त रक्कमेचा वापर हा कार्यालयीन सुधारणेसाठी करावयाचा असल्याने मा.आयुक्त यांच्या दि.17/06/2022 रोजीच्या मान्य प्रस्तावान्वये मनपाचे वाय सी एम रुग्नालयासाठी र.रु.9,72,810/- इतक्या रक्कमेचा सर्व्हर मध्यवर्ती भांडार विभागाद्वारे निविदा प्रसिद्ध करुन साहित्याचा पुरवठा मनपास करणेत आलेला आहे. शासननिर्णय क्रमांक रागांअ-1121/प्र.क्र.47/18/ अ, दि.18/04/2022 नुसार पारितोषिक प्राप्त रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र मा.शासनास सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रमाणे |

| | |
|---|---|
| | "राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा 2021" अंतर्गत प्राप्त झालेल्या र.रु.10,00,000/- मधून प्रत्यक्षात र.रु.9,72,810/- इतका खर्च होऊन मनपा कोषागारात/फंडात सदर बक्षिसाचे र.रु.27,190/- शिल्लक आहेत.नवीन थेरगाव रुग्णालय यांनी त्यांचेकडील दि.14/06/2023 रोजीच्या पत्रान्वये 0.65 KVA च्या 15 नग यु पी एस ची मागणी केलेली आहे. त्यानुसार सदरची शिल्लक र.रु.27,190/- अधिक मनपाचे र.रु.418/- असे एकूण र.रु.27,608/- मधून नवीन थेरगाव रुग्णालयासाठी मध्यवर्ती भांडार विभागाकडील निविदा क्र.GEM/2022/B/2528174 अन्वये 0.65 KVA युपीएस साठी करणेत आलेल्या दर करारातील दर र.रु.1972/- याप्रमाणे 14 नग युपीएस खरेदी करणे आवश्यक आहे. त्यानुसार 14 नग युपीएस च्या खरेदीसाठी र.रु.27,608/- इतका खर्च येईल. सदरची खरेदी मध्यवर्ती भांडार विभागामार्फत करणेत येऊन सदरचा खर्च माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील लेखाशिर्ष "संगणक खरेदी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट" या लेखाशिर्षावरुन करता येईल. तरी 14 नग यु पी एस खरेदीसाठी येणा-या र.रु.27,608/- चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम73 (क) नुसार मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९९३** **विषय क्रमांक- १९९३**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- करआकारणी व करसंकलन**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९९३ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कर/मुख्य/३/कावि/८१/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, श्री.अनिल लाड, माजी उपायुक्त तथा करनिर्धारक व करसंकलन कल्याण डोंबिवली म.न.पा. यांची करआकारणी व करसंकलन विषयक कामकाजासाठी सल्ला/मार्गदर्शनासाठी नियुक्तीबाबत. |
| **ठराव क्र.१९९३ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कर/मुख्य/३/कावि/८१/२०२३ दि.१४/०७/२०२३ अन्वये, करआकारणी व करसंकलन विभाग हा महापालिकेस स्थायी उत्पन्न देणारा विभाग आहे. शहरातील वाढता विस्तार व नविन होणा-या मालमत्ता विचारात घेता आकारणी न झालेल्या नविन / वाढीव मालमत्ता वर वेळेत करआकारणी करून मनपाचे उत्पन्नात वाढ करणे. तसेच मालमत्तावर केलेली आकारणी कायदेशीर तरतुदीचे अनुषंगाने योग्य व वाजवी असणे आवश्यक आहे. करसंकलन विभागात कामकाज करणारे कर्मचारी यांना करआकारणी व करवसुली विषयक सर्व बाबी ज्ञात असत नाहीत. त्या दृष्टीने कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे कायदेशीर तरतुदीसंबंधी माहिती देणे याकामी सदर कामकाजाचा सखोल माहिती असलेल्या अधिका-यांचे मार्गदर्शन असणे आवश्यक आहे. चालु आर्थिक वर्षापासुन मे.स्थापत्य कंन्सलन्ट प्रा. लि. यांचे कडुन महापालिका हद्दीतील सर्व मालमत्ताचे सर्वेक्षण करणेत येणार असुन आकारणी होणा-या मालमत्तांची आकारणी कार्यवाही सदोष होणे, आकारणीमध्ये काही अडचणी आलेस मार्गदर्शन घेणे, मा.न्यायालयीन प्रलंबित प्रकरणे निकाली होणेचे दृष्टीने कार्यवाही करणे, आवश्यकतेनुसार कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे, थकित मालमत्ताकर वसुली कारवाईचे अनुषंगाने आवश्यकतेनुसार प्रकरणी अभिप्राय घेणे इ कामकाजासाठी श्री.अनिल लाड यांची या विभागास मार्गदर्शनाकामी आवश्यकता असलेने संबंधिताना २ वर्षे कालावधीसाठी पुन्हा मुदतवाढ नेमणुक होणे आवश्यक आहे. करआकारणी व करसंकलन विभागाकरीता कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे व मालमत्ता कर वाढीचे दृष्टीने सल्ला / मार्गदर्शन मिळणे या कामकाजासाठी श्री.अनिल लाड माजी उपायुक्त तथा करनिर्धारक व करसंकलन कल्याण डोंबवली महानगरपालिका यांची महानगरपालिका कामकाजाची प्रदिर्घ सेवा व करआकारणी व करसंकलन विषयक कामकाजाचा अनुभव विचारात |

| | |
|---|---|
| | घेता करआकारणी व करसंकलन विभागाचे कामकाजासाठी सल्ला / मार्गदर्शन मिळणेकामी मा.प्रशासक यांचे कडील मा.स्थायी समिती ठराव क्र.२८६ दि.२३/०६/२०२२ अन्वये दि.११/०७/२०२२ पासुन १ वर्ष कालावधीकरिता प्रत्येक भेटीसाठी प्रति दिवस र.रु.१०,०००/- प्रमाणे अदा करणेच्या अटीवर नेमणूक करणेत आली होती. त्याअनुंषगाने कामाचा दि.३०/०६/२०२२ रोजी करारनामा करणेत आलेला आहे. करआकारणी व करसंकलन विषयक कामकाजासाठी संबंधितांची आवश्यकता असलेने सदरचे मंजुर ठराव व करारनामानुसार श्री.अनिल लाड यांना यापुढे २ वर्ष (२४ महिने) कालावधीकरिता नियुक्ती करणेस मान्यता देणेस येत आहे. तसेच संबंधितांना द्यावयाची रक्कम मिळकतकर वसुली खर्च या लेखाशिर्षातुन खर्ची टाकणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९९४** **विषय क्रमांक- १९९४**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- विद्युत मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९९४ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.अति.आयुक्त(१) विद्युत मुख्य यांचेकडील पत्र क्र.विमुका/०४/कावि/४८१/२०२३ दि.१७/०७/२०२३ अन्वये, मनपाचे क प्रभाग अंतर्गत विविध ठिकाणी उभारणेत आलेल्या सी.सी.टी.व्ही. यंत्रणेची वार्षिक तत्वावर देखभाल दुरुस्ती करणेबाबत. |
| **ठराव क्र.१९९४ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.अति.आयुक्त(१) विद्युत मुख्य यांचेकडील पत्र क्र.विमुका/०४/कावि/४८१/२०२३ दि.१७/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.03-03/2023-2024 अन्वये क प्रभाग अंतर्गत विविध ठिकाणी उभारणेत आलेल्या सी.सी.टी.व्ही. यंत्रणेची वार्षिक तत्वावर देखभाल दुरुस्ती करणे वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरीलप्रमाणे निविदा नोटीस क्र.03-03/2023-2024 साठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.फिनिक्स इन्फ्रास्ट्रक्चर्स या ठेकेदाराची निविदा रक्कमेच्या निविदा र.रु.35,65,099/- पेक्षा सुधारीत दर -0.20% कमी दराने आलेली निविदा असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याने तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा.अति.आयुक्त(1) सो. यांनी दि.14/07/2023 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.35,57,969/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेकामी सदरच्या विषयास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९९५** **विषय क्रमांक- १९९५**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- विद्युत मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९९५ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.अति.आयुक्त(१) विद्युत मुख्य यांचेकडील पत्र क्र.विमुका/०४/कावि/४८२/२०२३ दि.१७/०७/२०२३ अन्वये, मनपाचे इ प्रभाग अंतर्गत विविध ठिकाणी उभारणेत आलेल्या सी.सी.टी.व्ही. यंत्रणेची वार्षिक तत्वावर देखभाल दुरुस्ती करणेबाबत. |
| **ठराव क्र.१९९५ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.अति.आयुक्त(१) विद्युत मुख्य यांचेकडील पत्र क्र.विमुका/०४/कावि/४८२/२०२३ दि.१७/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.03-05/2023-2024 अन्वये इ प्रभाग अंतर्गत विविध ठिकाणी उभारणेत आलेल्या सी.सी.टी.व्ही. यंत्रणेची वार्षिक तत्वावर देखभाल दुरुस्ती करणे वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती**.** वरीलप्रमाणे निविदा नोटीस क्र.03-05/2023-2024 साठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.फिनिक्स इन्फ्रास्ट्रक्चर्स या ठेकेदाराची निविदा रक्कमेच्या निविदा र.रु.43,76,892/- पेक्षा सुधारीत दर -0.20% कमी दराने आलेली निविदा असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याने तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा.अति.आयुक्त(1) सो. यांनी दि.14/07/2023 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.43,68,138/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेकामी सदरच्या विषयास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९९७** **विषय क्रमांक- १९९७**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- मध्यवर्ती भांडार**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९९७ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.अति.आयुक्त(१) मध्यवर्ती भांडार यांचेकडील पत्र क्र.मभां/७/कावि/१७०/२०२३ दि.१७/०७/२०२३ अन्वये, मनपाचे वाय सी एम एच, पी जी आय च्या नेत्ररोग विभागासाठी आवश्यक उपकरणे ND YAG laser मशीन खरेदी करणेबाबत. |
| **ठराव क्र.१९९७ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.अति.आयुक्त(१) मध्यवर्ती भांडार यांचेकडील पत्र क्र.मभां/७/कावि/१७०/२०२३ दि.१७/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्यवर्ती भांडार विभागाकडील निविदा जेम क्र.Gem/2022/B/2461210 अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएम रुग्णालय पीजीआय नेत्ररोग विभागाकरीता १ नग ND YAG laser खरेदी करणेकामी जेम पोर्टेलवर निविदा प्रसिद्ध केली होती. वरील प्रमाणे निविदा क्र.Gem/2022/B/2461210 साठी 4 प्राप्त झालेल्या निविदांकारांपैकी पात्र झालेले M/sArthron technologies and enterprises त्यांचे दर निविदा रक्कमेच्या प्रती नग र.रु.28,37,999/- नुसार 1 नगासाठी लघुत्तम प्राप्त झाले असुन सदरचे दर अंदाजपत्रकीय दर र.रु.29,92,000/- पेक्षा -5.14 टक्केने कमी आहेत प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्याने स्विकृत करणेत आले असुन व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी |

| | |
|---|---|
| | दराने असल्याने करारनामा करून दर करार पद्धतीने पुरवठा करुन घेणेकामी सदरच्या विषयास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९९८** **विषय क्रमांक- १९९८**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- विद्युत अ क्षेत्रिय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९९८ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/कावि/३०३/२०२३ दि.१७/०७/२०२३ अन्वये, मनपाचे अ प्रभागाअंतर्गत फळे, फुले, भाजीपाला स्पर्धा व प्रदर्शन कार्यक्रमाकरीता व प्रभागातील इतर ठिकाणी विविध कार्यक्रमाकरीता आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरूपात ध्वनीक्षेपक, सीसीटीव्ही यंत्रणा व प्रकाश व्यवस्था करणे कामाअंतर्गत होणा-या वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.१९९८ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/कावि/३०३/२०२३ दि.१७/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पिंपरी चिंचवड संगीत अकादमी, निगडीचे कार्यकम व “वासंतिक संगीत शिबीर” च्या अनुषंगाने कार्यक्रमासाठी आवश्यक असणारी विद्युत व्यवस्था, ध्वनीक्षेपण व्यवस्था, इक्कलायझर, मिक्सर, थ्री वे सिस्टीम, जनरेटर व्यवस्था तात्पुरत्या स्वरूपात करणेसाठी मा.अतिरिक्त आयुक्त २ सो.यांनी आदेश क्रंमाक क्रीडा/२/कावी/५५८/२०२३ दि.१२/०४/२०२३ अन्वये पत्रान्वये कळविले होते. तसेच “सारथी सहाय्य केंद्र तथा जिजाऊ क्लिनिक” वाहतूक नगरी निगडी येथील उद्धाटना करिता विद्युत विषयक कामे करण्याबाबत मा.उप आयुक्त माहिती व तंत्रज्ञान यांनी आदेश क्र.मातवी/०२/कावी/८०/२०२३ दिनांक ०६/०४/२०२३ अन्वये पत्रान्वये कळविले आहे. तसेच ”स्वच्छ मशाल यात्रा” करिता विद्युत व्यवस्था, ध्वनीक्षेपण व्यवस्था करणेकामी मा.क्षेत्रीय अधिकारी अ क्षेत्रीय कार्यालय यांनी आदेश क्रं.अक्षेका/आ-१/१०४/२०२३ दिनांक २९/०३/२०२३ अन्वये पत्रान्वये कळविले होते. तसेच संगीत अकादमी मासिक सभेसाठी क्रीडा पर्यवेक्षक यांनी मेलन्वये प्रकाश व्यवस्था, ध्वनीक्षेपण व्यवस्था, जनरेटर व्यवस्था करण्याबाबत कळविले आहे. परंतू अ प्रभागाअंतर्गत फळे,फुले,भाजीपाला स्पर्धा व प्रदर्शन कार्यक्रमाकरीता व प्रभागातील इतर ठिकाणी विविध कार्यक्रमाकरीता आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरूपात ध्वनीक्षेपक,सीसीटीव्ही यंत्रणा व प्रकाश व्यवस्था करणे. (सन २०२२-२३) हे निविदा नोटीस क्र.५३/०१/२०२२-२३ चे काम सुरु आहे .सदर कामाची निविदा र.रु.१७,५५,२५०/- इतकी आहे. ह्या कामावर आजपर्यंत र.रु.१७,१९,२५८/- इतका खर्च झाला आहे. सदर कामांतर्गत वर नमूद केलेल्या कामासाठी प्रकाश व्यवस्था, सी सी टी व्ही व्यवस्था, ध्वनीक्षेपण व्यवस्था, जनरेटर व्यवस्था इत्यादी कामे प्राप्त दर ७.७५% कमी दरानुसार मे.मेडियाटेक सोल्युशन एजन्सीकडून करण्यात आलेली आहे .उपरोक्त वर नमुद केलेल्या कार्यक्रमासाठी आवश्यक कामाचे शासनाच्या दरसुची २०२२-२३ नुसार अंदाजपत्रक तयार केले असुन त्यास र.रू.३,५८,०२६/- इतका खर्च अपेक्षित होता आणि सदरचे काम मे.मेडियाटेक सोल्युशन यांनी समाधान-कारक पुर्ण केले आहे. मे.मेडियाटेक सोल्युशन यांनी दि.२१/०४/२३ च्या पत्रान्वये इकडील विभागास बील र.रू.३,५८,०२६/- अदागयी करण्याची मागणी केली आहे. सदर बिल योग्य असुन मे.मेडियाटेक सोल्युशन यांना अदा करणे आवश्यक आहे. परंतू सदर कामाचा खर्च निविदा रक्कमेपेक्षा वाढीव होत आहे. सदर खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळाल्यानंतर अतिरिक्त खर्चाचा करारनामा करण्यात येणार आहे. |

| | |
|---|---|
| | <table><tr><td>मूळ निविदा रक्कम</td><td>अतिरिक्त वाढीव खर्च</td><td>सुधारित निविदा रक्कम</td></tr><tr><td>१७,५५,२५० +GST</td><td>३,५८,०२६+GST</td><td>२१,१३,२७६ +GST</td></tr></table> सदरचा होणारा खर्च अ क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभागाकडील सन २०२३-२४ चे मुळ महसुली अंदाजपत्रकात र.रु.२,००,००,०००/- "ध्वनिक्षेपण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती" ह्या लेखाशिर्षावर तरतुद करण्यात आली आहे. सदर शिल्लक तरतुदीमधून सदर काम करणे शक्य आहे. तरी सदर निविदा रक्कमे पेक्षा अधिक होणा-या र.रु.३,५८,०२६/- +GST चे खर्चास मा.प्रशासक यांची कार्योत्तर मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- १९९९** **विषय क्रमांक- १९९९**

**दिनांक – १८/०७/२०२३** **विभाग- विद्युत अ क्षेत्रिय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१९९९ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/कावि/३०४/२०२३ दि.१७/०७/२०२३ अन्वये, केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आकुर्डी येथे घरे बांधणे या विद्युत विषयक कामाकरीता आवश्यक तरतूद वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत. |
| **ठराव क्र.१९९९ दिनांक - १८/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/कावि/३०४/२०२३ दि.१७/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोहन नगर आकुर्डी येथे ५६८ घरे बांधण्यात आली आहेत. सदर विद्युत विषयक कामाकरीता अ क्षेत्रीय विद्युत विभागामार्फत निविदा नोटीस क्र.४४/०१--२२/२३, निविदा र.रु.५,३५,७९,३१०/- कामाचा आदेश क्र.-विमुका/०८/कावि/६२/२०२३ दिनांक-२४/०३/२०२३ मे.एस.एम. ईलेक्ट्रीक वर्क्स यांना निर्गत करण्यात आलेले आहे. सदर घरांसाठी विद्युत पुरवठा करणेकामी आवश्यक असणारा उच्चदाब वीजपुरवठा घेणेकामी जय गणेश व्हिजन आकुर्डी सब स्टेशन ते साईट वरील ट्रान्सफॉर्मर रुम पर्यंत उच्चदाब केबल टाकण्याचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. तसेच ट्रान्सफॉर्मर रुम ते प्रत्येक इमारतीच्या मीटर रुम पर्यंत लघुदाब केबल टाकण्याचे कामकाज हे पुर्ण करण्यात आलेले आहे. तसेच सदर कामातील जनरेटर चे Factory inspection पुर्ण झालेले आहे आणि रोहित्र संच सुद्धा उत्पादीत कंपनी मध्ये म.रा.वि.वि. कंपनीच्या टेस्टिंग कामी तयार आहे. सदर कामातून फायर फायटिंग व्यवस्था, स्ट्रीट लाईट पोल व इतर विद्युत विषयक इन्फ्रास्ट्रक्चर ची कामे ह्या कामातून करण्यात येणार आहे. सदर कामाकरिता सन २०२३ -२४ च्या अंदाजपत्रकामध्ये पानांक ४५२ अनुक्रमांक १७७ अन्वये र.रु.७ कोटी इतकी प्रशासकीय मान्यता व र.रु.२,००,००,०००/- इतकी तरतूद उपलब्ध आहे. सदर कामामध्ये आत्ता पर्यंत साईटवर पुर्ण करण्यात आलेल्या विद्युत विषयक कामापोटी सबंधित एजन्सीला दुस-या धावत्या बिलाच्या अनुषंगाने र.रु.१,९९,९१,३८३/- इतकी अदागायी करण्यात आली आहे. तसेच सदर उर्वरित विद्युत विषयक कामासाठी अ क्षेत्रीय विभागाकडे सन २०२३ -२४ च्या अंदाज पत्रकामध्ये अपुरी तरतूद आहे. मा.कार्यकारी अभियंता PMAY प्रकल्प विभाग यांनी जा.क्र.स्था./PMAY प्र./२७२/२०२३ दि.०६/०७/२०२३ रोजी विद्युत विषयक इन्फ्रास्ट्रक्चरची कामे करण्यासाठी आकुर्डी प्रकल्पासाठी प्रत्येकी १ कोटी इतकी तरतूद उपलब्ध असल्याचे इकडील विभागास पत्रान्वये कळविले आहे. सदर कामास तरतूद वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी घेणेकामी शिफारस करण्यास मान्यता आवश्यक |

असलेने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्र. | लेखाशीर्ष | कामाचे नाव | अंदाज पत्रक पानांक /अनु क्र | ब जे ट | उपलब्ध तरतूद र.रु. | तरतूद वाढ र. रु. | तरतूद घट र. रु. | सुधारित तरतूद रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नवीन काम स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे | केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटकांसाठी आकुर्डी येथे घरे बांधणे या कामांतर्गत विद्युत विषयक कामे कारणे. | ४५२/१७७ | 222306656 | 20000000 | 10000000 | 0 | 30000000 |
| २ | Road pavements and concrete | प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बो-हाडेवाडी येथे निवासी गाळे बांधणे. प्रकल्पामधील उर्वरित मुलभूत सुविधा (Infrastructure) विकसित करणे. | ५४/०९ | 232400180 | 10000000 | 0 | 5000000 | 5000000 |
| ३ | Road pavements and concrete | प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी च-होली येथे निवासी गाळे बांधणे. प्रकल्पामधील उर्वरित मुलभूत सुविधा (Infrastructure) विकसित करणे. | ५४/२० | 232400191 | 15000000 | 0 | 5000000 | 10000000 |
| | | | | | 45000000 | 10000000 | 10000000 | 45000000 |

निर्णय: **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी विषयास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेस मंजूरी दिली.**

**सही/-**
(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.